# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 21/04/2017 रोजी (का.प.क्र.14 दि.21/03/2017 रोजीची तहकूब सभा ) संपन्न झालेल्या अर्थसंकल्पीय स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

शुक्रवार दिनांक 21 एप्रिल-2017 (का.प.क्र .14 दि.21/03/2017 रोजीची तहकुब सभा) रोजी मा.सभापती श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दूपारी 03.00 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.रविंद्र निकम, नगरसचिव श्री.दिलीप सुर्यवशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1. | स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप |
| 2. | स.स.श्री.सिताराम इसराम सुरे |
| 3. | स.स.श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| 4. | स.स.श्री.गजानन भानुदास मनगटे |
| 5. | स.स.श्री.विकास प्रकाश एडके |
| 6. | स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| 7. | स.स.श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड |
| 8. | स.स.श्रीमती शेख समीना इलियास |
| 9. | स.स.श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| 10. | स.स.श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| 11. | स.स.श्रीमती मनिषा बाळासाहेब मुंडे |
| 12. | स.स.श्री.सोहेल शकील शेख |

मा.सभापती :तहकूब सभा सुरू.

श्री.कैलास गायकवाड :खुलासा करण्यात यावा. मा.आयुक्त महोदय सदरच्या बजेटच्या बैठकीस उपस्थित असणे आवश्यक होते, नागरीकांच्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी आयुक्त सभेमध्ये हजर असणे आवश्यक होते, ते आले नाही, बैठक कशासाठी घेण्यात येते, बजेटच्या बैठकीस आयुक्त हजर नाही, ही दुर्दवी बाब आहे. अधिकारी यांना अर्धवट माहीती असते, मा.आयुक्त उपस्थित नसल्याने सभा तहकूब करण्यात यावी. स.सदस्यांचे उत्तरे देणे आवश्यक आहे.

श्री.विकास एडके :स.सदस्यांशी सहमत आहे, चालू कामांचा समावेश केलेला आहे, निधी ठेवलेला नाही, याचा खुलासा करण्यात यावा.

श्रीमती संगिता वाघुले :सभा पाच मिनटांसाठी तहकूब करण्यात यावी.

श्री.राजगौरव वानखेडे :संपूर्ण शहराचे बजेट सादर करत असतांना मा.आयुक्त बैठकीसाठी हजर नाही, हजर असलेले आयुक्त हे आपल्या प्रश्नांचे उत्तरे देवु शकतात का? त्यांचा अभ्यास झालेला आहे का?

मा.सभापती :सभेला आयुक्त का आले नाही, खुलासा करण्यात यावा.

श्री.कैलास गायकवाड :मा.आयुक्तांची बैठकीला येण्यासाठी वाट पाहण्यात यावी.
(मुख्यलेखाधिकारी पदावर रूजू झालेले श्री.सोळुंके तसेच शिक्षणअधिकारी पदावर रूजू झालेले श्रीकांत कुलकर्णी सभागृहास आपला परिचय करून देतात)

मा.आयुक्त :मा.आयुक्त अडीच दिवसांच्या सुट्टीवर आहे, कार्यभार संभाळण्यासाठी मला पत्र दिलेले आहे. बजेट प्रशासनाच्या वतीने स्थायी समितीकडे सादर केलेले आहे. मा.स्थायी समितीचे अधिकार आहे.

श्री.कैलास गायकवाड :उत्तर देण्यास विभाग प्रमुख सक्षम आहे का?

श्री.राजगौरव वानखेडे :मागील बैठकीत मा.आयुक्त यांनी बजेटचा अभ्यास करून वाचून घेण्यासंबधी सूचना केल्या होत्या, आता त्या मध्ये काही त्रृटी आढळून आलेल्या आहेत.

मा.सभापती :सर्व सदस्यांच्या नाराजी होत्या, स्थायी समितीचे अधिकार आहे त्याचा वापर करून शहर विकासा संदर्भात निर्णय घेवु.

श्रीमती शेख समीना :स्पिलमधील कामाबाबत खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता :जे कामे मंजूर झालेले आहे, वर्क आर्डर झालेल्या आहेत, ते कामे स्पिलच्या लिस्टमध्ये समावेश आहे.

श्री.विकास एडके :स्पिलच्या कामांचा समावेश झालेला नाही.

श्रीमती सिताराम सुरे :पान क्र 58 अ.क्र.451 चे कामाचे वर्क आर्डर झालेले आहे, कॉक्रीटकरणाचे 18 लाखाचे, वार्ड क्रमांक 8 25 लक्षाचे कामाचे वर्कऑर्डर दिलेले आहे, 15 लाख रूपये दाखवलेले आहे. अर्धे कामे स्पिलमध्ये दाखवलेले आहे, त्यामुळे आयुक्त यांनी सभेला हजर राहावे.

श्री.विकास एडके :वार्ड क्रमांक 52 मध्ये 20 लाखाचे काम आता स्पिलमध्ये 10 लाखाचे दाखवलेले आहे.

श्री.सिताराम सुरे : उपअभियंता यांना एक एक करून खुलासा करण्यास सांगण्यात यावे,

श्रीमती शेख समीना :एक एक काम दोनदा स्पिलमध्ये आलेले आहे.

कार्यकारी अभियंता (श्री.कोल्हे):स्पिलची यादी खर्चाचे अंदाज दिले होते, ब्लॉक बजेट ठेवलेले आहे, ते कामे होतात.

मा.सभापती : सर्व कामांची वर्क ऑर्डर झालेले आहे, सर्व स.सदस्यांच्या म्हणने आहे की, स्पिलमध्ये कामे आलेले नाही, असे करू शकत नाही.

श्रीमती शेख समीना :एकच काम दोन तीन वेळेस आलेले आहे.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांचेवर कार्यवाही होईल, संबधीत अधिकारी यांनी यासंबधी दुरूस्ती करण्यात यावी,

श्रीमती शेख समीना :नविन कामे होत नाही, स्पिलचेच कामे ॲड होत जातात.

कार्यकारी अभियंता :भूसंपादना अभावी काही रस्त्यांचे कामे राहीलेली असेल तर ते कामे दोन दोन तीन वर्ष स्पिलमध्ये येतात.

मा.सभापती :कारण असेल तर ते स्पिलमध्ये घेण्यात यावे, कारण नसल्यास ते स्पिलमध्ये घेण्यात येवु नये.

श्री.कैलास गायकवाड :कलम 95 नुसार जमा खर्चाचे अंदाज स्थायी समितीकडे सादर करणे बंधनकारक आहे. परंतु अर्थसंकल्प सादर केला. डायरेक्ट बजेटबुक सादर केलेले आहे. मा.आयुक्त महोदय यांनी या सभेचा हक्कभंग केलेला आहे. मा.आयुक्त महोदय यांचेवर हक्कभंगाचा प्रस्ताव का सादर करण्यात येवु नये, स.सदस्यांचे उत्तर देण्यास सक्षम नसल्याने आज सभेमध्ये गैरहजर आहे असा माझा आरोप आहे. स्थानिक संस्था कराचे एकुण किती रक्कम जमा झाली, मालमत्ता कराची 130 कोटी

रूपयांची तुट दाखविलेली आहे, कमी वसुलीचे कारण काय? रूपये 260 कोटींची तुट आहे, यास जबाबदार कोण आहे. मालमत्ता वसुलीचा अंदाज 230 कोटींचा दिलेला आहे. प्रशासनाचा सुधारित अंदाज 100 कोटी आहे. मागणी आणि थकबाकी विषयी खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

करमुल्य निर्धारक व संकलक :मागच्या वर्षी मालमत्ताची डिमांड 376 कोटीची होती, प्रत्यक्ष उद्दिष्ट 230 कोटींचे आहे. 374 कोटींची मागणी होती 94 कोटींची चालू मागणी होती, उर्वरित रक्कम ही थकबाकी होती. न्यायालयीन प्रकरण, वादग्रस्त प्रकरणे आहेत. 230 कोटीमध्ये 80 कोटी चालू मागणी आहे. 146 कोटी थकबाकी आहे. प्रशासनाने आठ हजार नविन मालमत्तांचा शोध घेतलेला आहे. प्रत्येक ठिकाणी कॅम्प लावुन वसुली केलेली आहे. तीन लाखाच्या आसपास शहरात मालमत्ता आहेत आपल्या रेकॉर्डवर दोन लाख एक हजार आहेत. नविन मालमत्तांचा शोध घेण्याचे प्रशासनाने पुरेसे प्रयत्न केलेले आहे नविन मालमत्ता रेकॉर्डवर आणलेल्या आहेत.

मा.सभापती :एलबीटी विषयी माहिती देण्यात यावी.

एलबीटी विभाग प्रमुख :1 एप्रिल ते 31 मार्च 2017 पर्यंत 200 कोटींची वसुली झालेली आहे. शासन अनुदान 158.68 कोटी रूपये आहे. प्रशासनाचे उद्दीष्ट 235 कोटी रूपयांचे होते,

श्री.कैलास गायकवाड :सुधारित अंदाज किती ठेवलेला आहे. सुधारित अंदाज 260 कोटी ठेवलेला आहे, 235 कोटींचा ठेवलेला आहे. सध्या 40 कोटींची तुट आलेली आहे. एकुण 950 कोटींचे बजेट ठेवलेले आहे, म्हणजेच बजेट हे फुगलेले आहे. स्पिलचे कामे आहे, कोणत्याही स.सदस्यांचे या ठिकाणी कोणतेही विकासाचे कामे होणार नाही. फक्त बजेट देण्याचे काम प्रशासनाने केलेले आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :2016-17 ला ज्या वेळी बजेट सादर केले होते, प्रशासनाने काही उदि्ष्ट ठेवलेले होते, मालमत्ता कर 230 कोटी पैकी 83 कोटी रूपये आलेले आहे. शासकीय अनुदान 170 कोटी रूपये दाखवलेले आहे. शैक्षणिक करा संदर्भाने 83 कोटी अनुदान संदर्भांत शासनाने सांगितलेले आहे की, अनुदान बंद झालेले आहे. मालमत्ता करा संदर्भांत प्रशासनाने गांर्भियाने घेतले पाहिजे. साधारणतः 300 कोटी रूपये वसुली होईल. शासकीय अनुदान संदर्भांत कित्येक वेळा सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे. शासकीय अनुदानासाठी एखादी एजन्सी किंवा अधिकारी यांची नेमणुक करावी. बजेट करतांना वास्तविक बजेट सादर झाले पाहिजे त्यामध्ये वाढ करणे योग्य नाही, यामध्ये लक्ष देणे आवश्यक आहे, प्रशासनाचे यामध्ये कामे आलेले नाही, स्पिलचे कामे आलेले नाही, स.नगरसेवकांची कामे आलेली नाही. त्या कामांचा समावेश बजेटमध्ये करण्यात यावा.

मा.सभापती :शासनाच्या अनुदानासंदर्भांत मागील बैठकीतही चर्चा झालेली आहे, एक सक्षम अधिकारी यांची नियुक्ती करण्यात यावी. मालमत्ता वसुली संदर्भांत प्रशासनाने 1 एप्रिल पासून सुरवात केली पाहिजे, या संदर्भांतील नियोजन करण्यात यावे, मालमत्ता सर्वे संदर्भांत टेंडरची प्रक्रीया विलंब होत आहे त्या दृष्टीने प्रशासनाने आपल्या स्तरावरून योग्य प्रकारचे नियोजन करण्यात यावे, स.सदस्यांनी सूचित केल्यानुसार सर्व माहिती पुढील बैठकीत देण्यात यावी.

श्री.गजानन मनगटे :सन 2016-17 साठी महिला व बालकल्याण विभागासाठी किती बजेट ठेवले होते व किती खर्च करण्यात आले, खुलासा करण्यात यावा.

| | |
|---|---|
| मुख्यलेखापरिक्षक | :महिला व बालकल्याण विभागातील योजनेकरीता एक कोटी बारा लाख खर्च झालेला आहे. साधारणतः दोन कोटी प्रस्तावित केले होते, सन 2017-18 साठी सहा कोटींची तरतूद ठेवण्यात आलेली आहे. |
| श्रीमती संगिता वाघुले | :सदरचा खर्च कुठे व कसा झाला खुलासा करण्यात यावा. |
| मा.आयुक्त | :महिला व बालकल्याण अंतर्गत बालवाडीसाठी मिड डे शालेय पोषण आहारामध्ये खर्च झालेला आहे, एक कोटी रूपये खर्च झालेला आहे. |
| श्री.गजानन मनगटे | :चार कोटी का खर्च करण्यात आले नाही, एकुण 9 कोटी रूपये सन 2017-18 साठी ठेवले पाहीजे, शिलाई मशिन, अपंगाना सायकल या सारख्या योजना नागरीकांपर्यंत पोहचविल्या गेल्या पाहिजे, हे पैसे खर्च करण्यासाठी उपाययोजना केल्या पाहिजेत. |
| मा.सभापती | :प्रशासनाने तातडीने अंमलबजावणी करायला पाहिजे. |
| मा.आयुक्त | :महिला व बालकल्याण सभेकडुन जे ठराव पास होतात त्यानुसार पुढील कार्यवाही प्रशासन करतो, महिला व बालकल्याण समितीच्या वतीने शिलाई मशिनचा जो ठराव मंजूर झाला त्या संदर्भाने चार वेळा निवीदा काढल्या होत्या परंतु प्रतिसाद आलेला नाही. |
| श्री.गजानन मनगटे | :मा.शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे नावाने मोफत अंत्यविधीची योजना सुरू केली होती. त्यासाठी अडीच कोटी रूपये खर्च आहे, गरीब व गरजु लोकांना ती योजना लागू केली पाहिजे. यासंबधी बजेटमध्ये तरतुद ठेवण्यात यावी. |
| श्री.कैलास गायकवाड | :गरीब नागरीकांना अंत्यविधीसाठी पैसे नसतात. बाहेरगावुन नागरीक इलाज करण्यासाठी शहरात येतात परंतु त्यांची आर्थीक परिस्थिती चांगली नसल्याने निधन झालेल्या व्यक्तीकरीता अंत्यविधीसाठी पैसा नसतात. निधन झालेल्या अशा नागरीकांना त्याचा फायदा झालेला नाही. सामाजिक संस्था आहे त्या मदत करू शकतात. काही संस्थांकडुन चेकच्या माध्यमातुन निधी आला होता. मनपाचे खाते आहे, त्या खात्यावर निधी येऊ शकतो, प्रचलित पध्दतीने ती येजना चालू असावी. |
| श्री.सोहेल शेख | :कब्रस्थानामध्येही अशी योजना ठेवण्यात यावी. |
| श्रीमती शेख समीना | :कब्रस्थान आणि स्मशनाभुमी येथे दोन्ही ठिकाणी स्वतंत्र अशी योजना चालू ठेवावी. औरंगाबाद शहराला ऐतिहासिक असा वारसा लाभलेला आहे. बजेटचा अभ्यास केल्यानंतर असे दिसुन येते की, ऐतिहासिक वारशासाठी तरतुद ठेवलेली नाही ती ठेवण्यात यावी. नहर ए अंबरी द्वारे शहराला पाणीपूरवठा होतो त्यासाठी तरतुद ठेवलेली नाही, नहरी व विहीरीसाठी 25 लाखाची तरतुद ठेवलेली आहे. नेहरू भवन दुरूस्तीसाठी पुरेशी तरतुद ठेवण्यात आलेली नाही. नहर ए अंबर संवर्धन व दुरूस्तीसाठी दोन कोटींची तरतुद ठेवण्यात यावी. 52 दरवाजे दुरूस्तीसाठी एक कोटीची तरतुद ठेवावी, नेहरू भवनसाठी 50 लाखाची तरतुद ठेवावी, कब्रस्थानासाठी एक कोटीची तरतुद ठेवावी, अबुल कलाम संशोधन केंद्रासाठी दहा लाखाची तरतुद ठेवण्यात यावी. |
| मा.सभापती | :स.सदस्यांनी या ठिकाणी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. 52 दरवाज्यांच्या बाबत प्रशासनाने शासनाकडे पाठपुरवा करावा. शहराच्या विकासाठी या ठिकाणी आपण आलेलो असतो, कोणत्याही पक्षाचा नसतो तो फक्त शहराच्या विकासासाठी येथे असतो, मा.शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे नावांने जी अंत्यविधीची योजना होती त्यासाठी तरतुद ठेवण्यात येईल परंतु अत्यंत गरज असणाऱ्या नागरीकांना याचा लाभ मिळाला पाहिजे. |
| श्री.सिताराम सुरे | :डिपी रस्त्यासाठी कमी तरतुद ठेवली जाते त्यामुळे भुसंपानामध्ये अडथळे येतात. |

| | |
|---|---|
| मा.सभापती | :शासनाकडे 150 कोटी रूपयांचा रस्त्यांसाठीचा प्रस्ताव आहे. |
| श्री.सिताराम सुरे | :डिपी रस्त्याच्या भुसंपादनासाठी किती तरतुद ठेवलेली आहे. खुलासा करण्यात यावा. |
| मा.सभापती | :प्रत्येक वार्डामध्ये त्यासाठी बजेट ठेवलेले आहे. संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा. |
| मुख्यलेखाधिकारी | :भुसंपादनासाठी 25 कोटी रूपयांची तरतुद ठेवण्यात आलेली आहे. |
| श्री.सिताराम सुरे | :25 कोटी रूपयांमध्ये किती रस्ते संपादित करणार, भुसंपादनासाठी 100 कोटी रूपयांची तरतुद ठेवणे आवश्यक आहे. भुसंपादनाच्या हेडमध्ये शासन निधी यायला पाहिजे. |
| मा.सभापती | :शासनाकडे पाठपुरावा करणार आहे.  रस्त्यांच्या कामाकरीता शासनाकडे पाठपुरावा तात्काळ करण्यात यावा. याकरीता सक्षम अधिकारी पाठविण्यात यावा. |
| श्री.गजानन मनगटे | :मागच्या स्थायी समिती बैठकीमध्ये बीड बायपास येथील रूंदिकरणासंदर्भात मनावर घेतलेले आहे. प्रशासनाचे अभिनंदन करण्यात येते. रूंदिकरणासंदर्भात मार्कीग करण्यात येत आहे. |
| श्रीमती शेख समीना | :स्मशनभुमी करीता स्मशानजोगी आणि कब्रस्थानासाठी खादी यांची नेमणुकीसाठी एक कोटी रूपयांची तरतुद ठेवण्यात यावी. |
| श्री.कैलास गायकवाड | :386 कोटींची तुट असतांना या ठिकाणी बजेटवर चर्चा सभागृहात चालू आहे सभागृहातर्फे मा.सभापती यांना सर्व अधिकार देण्यात यावे. |
| श्रीमती संगीता वाघुले | :आरती नगरसाठी 50 लाखाचा विशेष आर्थिक निधी ठेवण्यात यावा. |
| मा.सभापती | : सर्व स.सदस्य यांनी सन 2016-2017 चे सुधारीत व सन 2017-2018 चे मुळ प्रशासनाने सादर केलेल्या जमा व खर्चाच्या अंदाजावर अभ्यास पुर्वक सर्वंकष चर्चा केलेली आहे. सर्व स.सदस्यांच्या वॉर्डातील देखभाल दुरूस्ती व वॉर्डातील विकास कामांबाबत प्रशासनामार्फत फारच कमी प्रमाणात कामे आल्यामुळे, स्थायी समिती मार्फत सन 2017-2018 च्या अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे वाढ करून तेव्हढ्याच रक्कमेच्या कामांचा समावेश करण्यांत येत आहे. तसेच सन 2016-2017 सुधारीत अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येते. |

प्रशासनाने सादर केलेल्या जमा बाजुच्या अंदाजामधील खालील बाबीमध्ये वाढ दर्शविण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| 01.स्थानिक संस्था कर | -275 कोटी ऐवजी 300 कोटी | 25 कोटीची वाढ |
| 02.मालमत्ता कर | -230 कोटी ऐवजी 300 कोटी | 70 कोटींची वाढ |
| 03.नगर रचना विभाग | -100 कोटी ऐवजी 125 कोटी | 25 कोटींची वाढ |
| 04.इतर किरकोळ उत्पन्न | - | 10.30 ोटींची वाढ |
| 05.शासन अनुदान | -81 कोटी ऐवजी 96 कोटी | 15 कोटींची वाढ |
| 06.पाणी पट्टी | -112 कोटी ऐवजी 127 कोटी | 15 कोटींची वाढ |

प्रशासनाने सादर केलेले एकुण उत्पन्न रू.950.42 कोटी मध्ये रू.160.30 कोटीची वाढ करून रू.1110 कोटी 72 लक्ष जमा व रू.1110 कोटी 53 लक्ष खर्चाचे व रू.19.00 लक्ष शिलकीचे अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 96 नुसार सर्वानुमते मान्यता देण्यांत येते. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 103 व 104 नुसार प्रशासनाने सादर केलेल्या सुधारीत अर्थसंकल्पास मान्यता देण्यांत येऊन महाराष्ट्र महानगरपालिका

अधिनियम 1949 चे कलम 100 अन्वये अंतिम मान्यतेसाठी सर्वसाधारण सभेसमोर पाठविण्यास शिफारस करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ठराव :**

प्रशासनाने सादर केलेल्या जमा व खर्चाच्या मुळ अंदाजावर सर्व सन्माननिय सदस्य यांनी सर्वंकष अभ्यास करून चर्चा केली सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेता या अर्थसंकल्पामध्ये सर्व समावेशक प्रभागात विकास कामे करण्याचा सर्व सदस्यांचा मोठ्या प्रमाणावर मानस आहे. तथापी महानगरपालिकेची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची व नाजुक असुन सुध्दा वरील सर्व बाबींचा विचार करून सन्मानिय सदस्यांच्या वार्डामध्ये नागरी सुविधा पुरविण्याच्या भावनेतुन विकास कामे करण्यासाठी जमा बाजुच्या अंदाजामध्ये वाढ सुचविण्यात येऊन देखभाल दुरूस्ती व विकास कामांचा समावेश अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेला आहे.

स्मार्ट सिटीच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये महानगरपालिकेचा समावेश झालेला असून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कराची वसुली ची टक्केवारी 80% होणे आवश्यक आहे. यासाठी शहरातील नव्या मालमत्तेचा शोध घेणे मालमत्ता कराच्या वसुलीमध्ये सुसुत्रता यावी व प्रभावीपणे वसुली करून महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रशासनाने सर्व विभागातील कार्यरत कर्मचाऱ्यांचा आढावा घेऊन अनावश्यक कर्मचाऱ्यापैंकी या दोन्ही विभागासाठी 25% वाढीव व आवश्यक कर्मचारी वर्ग उपलब्ध करून द्यावा. प्रशासनाने सादर केलेल्या जमा व खर्चाच्या अंदाजामध्ये सर्व वार्ड अभियंता कार्यालयाकडून विविध प्रभागातील स्पिल ओव्हरची काही कामे अंदाजपत्रकामध्ये राहून गेलेली आहे, अशी कामे जी स्थायी समिती मार्फत घेण्यात आलेली नाही अशी उर्वरित कामे मा.सर्वसाधारण सभेने समाविष्ट करून घेणे बाबत विनंती करण्यांत येते.

प्रशासनामार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 103 व 104 अन्वये सन 2016-17 चे सुधारीत अर्थसंकल्पीय जमा रू.580 कोटी 96 लक्ष 65 हजार या मध्ये प्रारंभीची शिल्लक 75 कोटी 01 लक्ष 84 हजार असे एकुण 655 कोटी 98 लक्ष 49 हजार व खर्च रू.586 कोटी 60 लक्ष 30 हजार विचारात घेऊन रू.69 कोटी 39 लक्ष 19 हजार शिलकीच्या सुधारीत अर्थसंकल्पास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात येते.

उपरोक्तनुसार प्रशासनाने सादर केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये फेरफार, दुरूस्ती व वाढ करून सन 2017-18 करीता महानगरपालिकेचे मुळ अंदाजपत्रक जमा रू.1041 कोटी 14 लक्ष 50 हजार यामध्ये प्रारंभीची शिल्लक 69 कोटी 39 लक्ष 18 हजार असे एकुण 1110 कोटी 52 लक्ष 69 हजार जमा व खर्च रू.1110 कोटी 31 लक्ष 50 हजार विचारात घेऊन रू.21 लक्ष 19 हजार शिलकीच्या अर्थसंकल्पास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 96 नुसार सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 103 व 104 नुसार सन 2016-2017 चे सुधारीत व सन 2017-2018 चे मुळ अर्थसंकल्प महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 100 अन्वये अंतिम मान्यतेसाठी मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर मा.सभापती यांनी सभा संपन्न झाल्याचे घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद